# पशुकल्याणासाठी आपण काय करू शकूं?

प्रा.डॉ. संतोष कुलकर्णी,
प्राध्यापक, शरीरक्रियाशास्त्र,
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय,
उदगीर. जि. लातूर

प्राचीन काळापासून पशुकल्याण हा विषय चर्चेत राहिला आहे. मात्र नवीन संदर्भात पशुकल्याणाचे महत्व वाढले आहे. पुरातन काळापासून मानवाने अनेक फायद्यांसाठी पशुपालन व्यवसाय केला. विविध जनावरांपासून मिळणा-या विविध उत्पादनांसाठी पशूंच्या अनेक सुयोग्य जातींना वन्यावस्थेतून पालनावस्थेत आणले. मानवाच्या स्वतःच्या उपयोगासाठी, फायद्यांसाठी त्याने पशुपालन केले हे खरे असले तरी पशुकल्याणाचीच ती एक पायरी होती व आहे असे म्हणता येते. कारण, सृष्टीच्या नियमानुसार जो जीव अधिक ताकदवान त्याच्या जीवनाचे मार्ग अधिक सुलभ असतात. जात्याच सौम्य, शांत व पाळीव वृत्तीच्या पशूंसाठी वन्यावस्था म्हणजे खडतर व असुरक्षित अवस्था होती. त्यांचे हिंस्र वृतीच्या पशूंपासून संरक्षण, आहार-आरोग्याची निगा व काळजी, व्यवस्थापन आदि बाबींनी अशा जनावरांच्या जीवनाचे नियमन व एका अर्थी कल्याणच मानवाने केले.

सृष्टीतील जिवांचे परस्परावलंबित्व हा सृष्टीचाच नियम असल्यामुळे मानव व पशू यांनी एकमेकांची केलेली सेवा ही योग्यच आहे. तथापि, या परस्परसंबंधात मानव हा अधिक प्रगत असल्यामुळे मानवाची जबाबदारी अधिक आहे. या संबंधात मानवाचा वरचष्मा असल्यामुळे जनावरांची निगा, संरक्षण, आरोग्यवृद्धी ही माणसाची कर्तव्येच आहेत. त्यामुळे खरेतर मानवाचाच अधिक फायदा होणार असून हे संबंध अधिकच दृढ होणार आहेत. सुदैवाने हे माणसाने ओळखले असल्यामुळे पशुकल्याणाचा वसाच त्याने स्वीकारला आहे. विविध धर्मातील मानवाने धार्मिक विधी म्हणूनही अनेक जनावरांची, पशूंची आपापल्या परीने व पद्धतीने पूजा करण्याचा संदेश पाळला आहे. गाय, बैल, म्हैस इतकेच नव्हे तर सापासारख्या प्राण्यांचीदेखील पूजा आपण करत असतो. त्यामागे साच संदेश व उद्देश आहे. मात्र काही प्रसंगी याचा विसर पडत असताना आपल्याला दिसत असते. अंधश्रद्धेखातर जनावरांचे दिले जाणारे बळी, तसेच, त्यांची हेटाळणी होताना आपल्याला दिसते. हा खचितच पशुकल्याणाचा अंगिकार आहे असे म्हणता येणार नाही.

एरवी, विविध उपयोगांसाठी जे पशूप्राणी आपण पाळीव म्हणून पाळतो, त्यांचे संगोपन, पालनपोषण केले तरी पशूकल्याणाचे फार मोठे श्रेयाचे भाग्य मिळवण्यासारखे आहे.सर्व पशूंच्या जगण्याचे, आहाराचे, वर्तनाचे, आरोग्याचे काही नियम असतात. समयमूल्ये असतात. ठराविक वयात ठराविक वेळी तसेच बदलत्या ऋतुमानानुसार काही गरजाही असतात., त्या गरजा भागवण्याकडे लक्ष दिले गेले पाहिजे. वय, लिंग, जाती, कार्यक्षमता, रोगप्रतिकारक्षमता, नैसर्गिक क्षमता, नैसर्गिक क्रिया यांनुसार पशूंचा आहार बदलतो. उदाहरणार्थ, लहान वयात वाढीसाठी भरपूर,सकस व निश्चित आहारघटक (विशैषतः प्रथिने) यांची गरज भागवली गेली पाहिजे. त्याचप्रमाणे, जनावरे प्रजननक्षमता ढारण करताना त्यांच्या या गरजा बदलतात. विशेषतः गर्भारावस्थेत, दुभत्या अवस्थेत अधिकाधिक प्रथिनांसोबत क्षार, पाणी यांची गरज वाढते. ऋतुमानानुसार उन्हाळ्यात पाणी व द्रावणे यांची निकड भागवली पाहिजे. हिवाळ्यात पावसाळ्यात, थंडीपासून रक्षण करण्याची दक्षता घेतली पाहिजे. अनेक प्राणीसंग्रहालयातून अशा प्रकारच्या उपाययोजना राबविल्या जातात. उन्हाळ्यात जनावरांच्या राहण्याच्या जागेत थंडावा रहावा यासाठी ओल्या पोत्यांचे पडदे लावणे, पाण्याचे फवारे मारणे तर हिवाळ्यात ऊब रहावी यासाठी आहारासोबत निवासस्थानाचे खालावणारे तापमान नियंत्रित करता येते. अशा उपाययोजनांमुळे जनावरांचा शारिरीक क्षमतेचा अपव्यय होत नाही. त्यांची ऊर्जा, ताकद व क्षमता यांच्यावर

Please purchase 'e-PDF Converter and Creator' on http://www.e-pdfconverter.com to remove this message.

अधिक ताण पडत नाही. परिणामी, ती सशक्त बनतात, निरोगी बनतात. अशा रितीने योग्य आहार, पाणी, निगा यांच्या व्यवस्थापनातून जनावरांचे रोगांपासून तसेच ऋतुमानाच्या दुष्परिणामांपासून रक्षण करावे लागते.

तथापि, आजारापासून संपूर्ण मुक्तता कुठल्याच जिवाची होत नाही. कुठल्याही आजार व व्याधीपासून लवकरात लवकर सुटका करून घेणे किंबहुना, प्रतिबंध करुन शरिराची व आरोग्याची अधिक हानी होनार नाही, याची काळजी घेणे आपल्याच तर हातात असते. विशिष्ट ऋतुमध्ये विशिष्ट व्याधी व रोगांचा प्रादुर्भाव होण्याच्या नियमित शक्यता लक्षात घेवून स्वच्छता, लसीकरण, ओषधोपचार यांची नियमितता पाळणे ही पशुपालकाची जबाबदारी असते. पशूंना त्याचे ज्ञान नसते व भानही नसते, याचेच भान आपण बाळगले पाहिजे. उदाहरणच द्यायचे झाले तर असे म्हणता येईल की हिवाळ्यात श्वसन संस्थेचे आजार अधिक होवू नयेत, उन्हाळ्यात उष्माघाता सारख्या व्याधी होवू नयेत तसेच पावसाळ्यात लाळ्याखुरकुतासारख्या रोगाची लागण होवू नये म्हणून वेळीच खबरदारी घेणे हे कर्तव्य आहे. किमान एवढी काळजी पशुवैद्यकाअगोदर पशुपालकाने घेतली पाहिजे. अगदी लहान वयात तसेच वृद्धापकाळात पशूंची प्रतिकारक्षमता कमी असते हे ध्यानात घेवून रोगांपासून रक्षण व उपचारयोजना करावी लागते. पशुपक्ष्यांचेही एकए जीवनमान आपण कबूल केले पाहिजे. त्यांच्याही निवासाची सोय त्यांच्या गरजनुसार, क्षमतेनुसार करावी लागते. पक्ष्यांची खुराडी, गुरांचे गोठे तबेले यांमध्ये भरपूर हवा, प्रकाश व स्वच्छता यांच्या सोयी करणे आवश्यक असते. प्रत्येक जनावरास त्याच्या आकारमान, हालचालीनुसार किती जागा लागते, छपराची उंची, जमिनीचे स्वरूप, वातायनांची संख्या व आकार इ. बाबींचा विचार करून जनावारंची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. अशा बाबींकडे दुर्लक्ष करून पशूकल्याण साधता येणार नाही. पशूंच्या साधारण नैसर्गिक वृत्ती व वर्तन योग्य रहावे, त्यात बाधा वा विकृती येणार नाही याची शरिरक्रयांशास्त्राच्या दृष्टीने काळजी घ्यावी लागते व त्यामध्ये त्यांच्या निवासाच्या जागेतील सोयींचाफार मोलाचा भाग असतो. अगदी माणसाला लागतात त्याचप्रमाणे पशूंनाही त्याच सुखसोयी लागतात असे थोडेच आहे? सुदैवाने त्यांची त्याबाबतीतली गरज खूपच माफक असते. ती पुरवण्यासाठी फार मोठी साधने लागतात असेही नाही. अगदी टाकाऊ वस्तूंपासून आपण त्यांच्यासाठी अशा सोयी निरमाण करू शकतो. विदेशात, प्रगत देशांत अशा खूपच सुखसोयी जनावरांसाठी करण्यात येतात व त्याचे फायदेही मिळतात. मात्र आपल्याकेडे एवढ्या सुखसोयी जनावरांसाठी, पशुपक्ष्यांसाठी निर्माण करणे परवडणार नाही असे मानले जाते. आपला शतकरीही गरीब आहे. पण तरीही केवळ पशुप्रमामुळे व कल्पकतेच्या साह्याने तो आपल्या जनावरांसाठी खूप काही करत असतो. करूही शकतो.

अजून एक महत्वाचा मुद्दा या बाबतीत मांडणे आवश्यक आहे. तो म्हणजे, अनेक वेळा आपण जनावरांची अनेक कारणांनी वाहतूक करत असतो. प्रदर्शनासाठी, स्थलांतर करत असताना, खरदी-विक्रीखातर बाजारातून आपल्या गावी, घरी या जनावरांना नेत-आणत असतो. अशा वेळी जनावरांची फार हेळसांड केली जाते. मुळात प्रवासाचा ताण त्यांच्यावरही पडत असतो आणि हे शास्त्रीयदृष्ट्या पर्योगांतून अनेक पद्धतींनी सिद्धही झाले आहे. पण त्याकडे दुर्लक्ष होते.पर्वासातील काळात वेळच्यावेळी चारा-पाणी इतकेच काय पण मोकळी हवा घेण्याच्या हक्कांपासूनही आपण मुक्या प्राण्यांना वंचित ठेवतो. तसेच प्रवासकाळात वाहनखर्च वाचवण्यासाठी कित्येकवेळा जनावरांची लहान वाहनात अक्षरशः कोंबाकोंबी केली जाते. हल्ली माणसांचीही अशी कोंबाकोंबी करतात पण जनावरांची याबाबतीतही अधिकच कुंचंबणा केली जाते. प्रवासकाळात जनावरांनाही आराम देण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. प्रवासात कोणती काळजी घेतली पाहिजे यावर अनेक शास्त्रज्ञांनी प्रयोगाअंती अनेक निष्कर्ष काढले आहेत व तो एक स्वतंत्र विषयच आहे. त्यांनी काही उपाययोजनांची शिफारसच केली आहे व त्याचा अंतर्भाव तर काही देशांत कायद्यातही अशा शिफारशींची दखल घेतली गेली आहे. याशिवाय, दैनंदिन कामकाजातील काही बाबींकडेही पशुकल्याणाखातर नियमितपणे लक्ष पुरवलेलगेले पाहिजे. उदाहरणार्थ, कामाच्या वेळांचे नियोजन करताना ऋतू, हवामान, कामाचे स्वरूप, जनावरांचे वय, शारिरीक अवस्था, क्षमता यांचा विचार करायला हवा. राबणा-या कोणत्याही जनावराच्या बाबतीत काही

Please purchase 'e-PDF Converter and Creator' on http://www.e-pdfconverter.com to remove this message.

निकष लावले पाहिजेत. मग ते गाढव का असेना. त्याचप्रमाण, मारहाणकरणे, वाजवीपेक्षा अधिक ओझे व काम लादणे, जकमा करणे, विकृत करमणूकीखातर त्यांना शारीरिक वदना देणे इतकेच नव्हे तर अघोरी उपाय करणे टाळले पाहिजे. अंधश्रद्धेखातर बळी देणे जेवढे आक्षेपार्ह आडे तेवढेच अशास्त्रीय उपचार पद्धतीही अयोग्य असते. डाग देणे, तेल पाजणे, लोढणे बांधणे, शिंग मोडणे, अशा अनेक पद्धतींनी आपण जनावरांचे आरोग्या वाचवण्याऐवजी धोक्यात आणतो.या पद्धती अमानुष तर आहेतच पण त्या अशास्त्रीय व त्यामुळे घातकही ठरू शकतात. म्हणून कुठल्याही परिस्थितीत पशूवैद्यकाच्याच सल्ल्याने उपचार केले पाहिजेत. त्याचा सल्ला पाळला पाहिजे. अणेक रोगांच्या, व्याधींच्या प्रतिबंधासाठीही पशूवैद्यकच आपल्याला सर्वंकष असा सल्ला देवू शकतात. लसीकरणासह, निर्जंतुकीकरण, वातानुकूलन याबाबतीत पशुवैद्यकच आपल्याला योग्य मार्गदर्शन करत असतात.

त्याचप्रमाणे, पशुकल्याणाखातर काही नियम व कायद्यांचेही पालन केले पाहिजे. त्यात विमायोजना, क्रूरता निवारण, पशगणना यात पशुकल्याणाचा हेतू असतो, हे ध्यानात घेतले पाहिजे. याबाबतीत आपण जागरुक राहिले पाहिजे.

या सर्व अर्थांनी पशुकल्याणहा केवळ धार्मिक किंवा भूतदयेखातर करावयाचा नसून एक जागरूक नागरीक म्हणून या विषयाकडे आपण पाहिले पाहिजे.नव्या संकल्पनांनुसार पशुकल्याणाचा असा विचार आपण आत्मसात करू शकलो तर समस्त मानवाचे, समाजाचे हित आपण जोपासू शकतो. त्यातच सृष्टीबरोबर वातावरणाचा, पर्यावरणाचा व मानवी जीवनाचा समतोल राखण्यास मदत होणार आहे.

Please purchase 'e-PDF Converter and Creator' on http://www.e-pdfconverter.com to remove this message.